# क्रिडा

## १. सीआर/५६४/धुळे/१४

फिर्यादी हे विरदेल, तालूका शिंदखेडा, जिल्हा धुळे येथील विकास विद्या मंडळ या शैक्षणिक संस्थेचे सदस्य सचिव म्हणून काम करतात. सदर संस्थेची श्रीमंत गो.स.देवकर विद्यालय, विरदेल ही शाळा असून, सदर शाळेकरीता महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागातर्फे शाळांमधील क्रीडांगणाचे विकासाअंतर्गत मिळणारे अनुदानातून भांडारगृहाचे बांधकामासाठी रु. १,५०,०००/— व व्यायमशाळेचे साहित्य खरेदी करण्यासाठी रु. २,००,०००/— असे एकूण रु.३,५०,०००/— अनुदान मिळणेकामी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयांत प्रस्ताव सादर केलेला होता. तो प्रस्ताव मंजूर झाला. सदर अनुदानाचा चेक फिर्यादीस देण्यासाठी आरोपी लोकसेवक क्र.१ श्रीमती नंदा गजानन खुरपुडे, जिल्हा क्रीडा अधिकारी, वर्ग—१ व आरोपी लोकसेवक क्र.२ श्रीमती प्रभावती तुळशिराम देवरे, क्रीडा अधिकारी, वर्ग—३ यांनी मंजूर रक्कमेच्या १० टक्के प्रमाणे रु.३५,०००/— लाचेची मागणी केली. दिनांक ३०/०६/२०१४ रोजी आरोपी लोकसेवक क्र.२ श्रीमती प्रभावती देवरे यांनी रु. १५,०००/— व आरोपी लोकसेवक क्र.१ यांचे सांगणेवरुन आरोपी लोकसेवक क्र.३ भाऊसाहेब रामभाऊ जाधव, क्रीडा अधिकारी वर्ग—३ यांनी रु.२०,०००/— लाचेची रक्कम स्वीकारली.

सदरबाबत पश्चिम देवपुर पोलीस ठाणे, जिल्हा धुळे येथे गुरनं.३०२०/२०१४ कलम ७, १२, १३ (१) (ड) सह १३(२) लाप्रका १९८८ अन्वये नोंद करण्यात येवून तीन्ही आरोपी लोकसेवक यांना अटक करण्यात आलेले आहे